MHAU160041122025

दाखल तारीख:- १९.०७.२०२५
नोंदणी तारीख:- १९.०७.२०२५
निकाल तारीख:- २८.०३.२०२६
कालावधी:- **००** वर्षे, **०८** महिने **०९** दिवस

**गंगापूर येथील जिल्हा न्यायाधीश-१ व अतिरीक्त सत्र न्यायाधीश, गंगापूर, जि. छत्रपती-संभाजीनगर**
(पिठासीन अधिकारी शा. भा. बहाळकर)

**दिवाणी किरकोळ अर्ज क्रमाक.७९/२०२५** **निशाणी क्रमांक ११/अ**

**१. श्लोक संतोष पवार,**
वय:- ०८ वर्षे, (अज्ञान),
अ.पा.क. आई नामे सुनिता भ्र. संतोष पवार,
वय ५२ वर्ष, धंदा - शेती, रा. सावंगी,
ता. गंगापूर, जि. औरंगाबाद

**२. सुनिता भ्र. संतोष पवार,**
वय:- ५२ वर्ष, धंदा - शेती, रा. सावंगी,
ता. गंगापूर, जि. औरंगाबाद ..... **अर्जदार**

**विरुध्द**

**महाराष्ट्र शासन तर्फे**
जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद ...... **गैरअर्जदार**

.................................................................................................

अर्जदारांतर्फे - विधीज्ञ श्री. एस. आर. जोशी
जाब देणारांतर्फे - एकतर्फा

.................................................................................................

## न्यायनिर्णय
**(पारित दिनांक:- २८ मार्च, २०२६)**

अज्ञान मुलगा- श्लोक याच्या संयुक्त मालकीची स्थावर मिळकत विक्री करण्यास परवानगी मिळावी या करीता त्याचे आईने हा अर्ज पालक आणि पाल्य अधिनियम, १८९० चे कलम ८ प्रमाणे दाखल केलेला आहे.

**०२.** अर्जदार हिचे कथन असे आहे की, श्लोक हा तिचा अज्ञान मुलगा आहे. मौजे सावंगी, ता. गंगापूर येथील शेत गट क्रमांक ३९ मधील २० आर क्षेत्र हे फेरफार नोंद क्रमांक २९९७ प्रमाणे अज्ञान मुलगा - श्लोक याचे नांवे झालेली आहे व तशी नोंद संबंधीत मिळकतीच्या ७/१२ उता-यावर झालेली असून अर्जदार क्रमांक १ - श्लोक

अज्ञान असल्याने तिची अ.पा.क. म्हणून अर्जदार क्रमांक २ हिच्या नांवाची नोंद अभिलेखात करण्यात आलेली आहे.

**०३**. अर्जदार क्रमांक १ याचे भविष्यातील हिताचे काम करण्यासाठी व त्याचे भविष्य चांगले घडविण्यासाठी, त्याचे पालन-पोषण करण्यासाठी व शिक्षण करण्यासाठी अर्जदार क्रमांक २ हिला अनेक अडचणी निर्माण झाल्या आहेत. त्यामुळे अर्जदार क्रमांक १ याचे सर्वांगीण विकासावर परिणाम होत आहे.

**०४**. सबब, अर्जदार क्रमांक २ हिने उपरोक्त स्थावर मिळकत दि.१४.०४.२०२५ चे विक्री करारनामा/इसारपावती प्रमाणे लासूर स्टेशन, ता. गंगापूर येथील श्री. पियुष जयकुमार जैन या इसमास रुपये ६७,४६,४००/- चे मोबदल्यात विकण्याचे ठरविलेले आहे.

**०५**. अर्जदार क्रमांक २ हिचे पुढे असे कथन आहे की, सदर मिळकत विकल्यानंतर येणारा मोबदला हा फक्त अज्ञानाच्या शिक्षणासाठी, भविष्यासाठी व कल्याणासाठी वापरण्यात येणार आहे. म्हणून, उपरोक्त मिळकत विकण्यास या न्यायालयाने परवानगी द्यावी अशी विनंती अर्जदार क्रमांक २ हिने केलेली आहे.

**०६**. हा अर्ज दाखल झाल्यानंतर "दैनिक केसरी" या वृत्तपत्राच्या दिनांक २८.०८.२०२५ रोजीच्या अंकात जाहीर नोटिस (निशाणी क्रमांक ०७) प्रसिध्द करण्यात आली व त्याद्वारे आम जनतेतून कोणासही, या अर्जात नमूद केल्याप्रमाणे परवानगी देण्यास, हरकत असल्यास तशी हरकत नोंदवावी असे जाहीर आवाहन करण्यात आले. मात्र, आजपर्यंत या अर्जास कोणीही आक्षेप नोंदविलेला नाही किंवा आव्हानही दिलेले नाही.

**०७**. खालील मुद्दे माझ्या विचारार्थ उपस्थिती झाले. त्यावर मी खालील दिलेल्या कारणांकरीता माझे निष्कर्ष नोंदविलेले आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | | **निष्कर्ष** |
|---|---|---|---|
| १ | मौजे सावंगी, ता. गंगापूर येथील शेत जमीन गट क्रमांक ३९ क्षेत्र ०.२० आर ही मिळकत विकण्यास अर्जदार क्रमांक २ हिस परवानगी देणे न्यायोचित होईल काय ? | .... | नकारार्थी |

| | | |
|---|---|---|
| २ आदेश काय ? | ..... | अर्ज नामंजूर (Rejected) करण्यात येत आहे. |

## कारणमिंमासा

**मुद्दा क्रमांक १ करीता:-**

**०८.** अर्जदार क्रमांक २ हिने तिचे पुराव्याचे शपथपत्र (निशाणी क्रमांक ०८) दाखल केले आहे. त्यात तिने अर्जातील कथनांचा पुनरूच्चार केलेला आहे. थोडक्यात तिचे म्हणणे असे आहे की, अर्जदार क्रमांक १- श्लोक हा तिचा अज्ञान मुलगा आहे. मौजे सावंगी, ता. गंगापूर येथील शेत गट क्रमांक ३९ मधील २० आर क्षेत्र हे फेरफार नोंद क्रमांक २९९७ प्रमाणे अज्ञान मुलगा - श्लोक याचे नांवे झालेली आहे व तशी नोंद संबंधीत मिळकतीच्या ७/१२ उता-यावर झालेली असून अर्जदार क्रमांक १ - श्लोक अज्ञान असल्याने अ.पा.क. म्हणून तिचे नांवाची नोंद अभिलेखात करण्यात आलेली आहे.

**०९.** अर्जदार क्रमांक २ हिने पुढे असे कथन केले आहे की, अर्जदार क्रमांक १ याचे भविष्यातील हिताचे काम करण्यासाठी व त्याचे भविष्य चांगले घडविण्यासाठी, त्याचे पालन-पोषण करण्यासाठी व शिक्षण करण्यासाठी तिला अनेक अडचणी निर्माण झाल्या आहेत. त्यामुळे अर्जदार क्रमांक १ याचे सर्वांगीण विकासावर परिणाम होत आहे. म्हणून तिने उपरोक्त स्थावर मिळकत दि.१४.०४.२०२५ चे विक्री करारनामा/इसारपावती प्रमाणे लासूर स्टेशन, ता. गंगापूर येथील श्री. पियुष जयकुमार जैन या इसमास रुपये ६७,४६,४००/- चे मोबदल्यात विकण्याचे ठरविलेले आहे.

**१०.** अर्जदार क्रमांक २ हिचे पुढे असे कथन आहे की, सदर मिळकत विकल्यानंतर येणारा मोबदला हा फक्त अज्ञानाच्या शिक्षणासाठी, भविष्यासाठी व कल्याणासाठी वापरण्यात येणार आहे. म्हणून, उपरोक्त मिळकत विकण्यास या न्यायालयाने परवानगी द्यावी अशी विनंती तिने केलेली आहे.

**११.** वरील आशयाचे व मजकुराचे शपथपत्र (निशाणी क्रमांक ०९) अज्ञान मुलगा - श्लोक याचे पिता संतोष भास्कर पवार यांनी देखील दाखल केलेले आहे.

**१२.** अर्जदार क्रमांक १ - श्लोक हा अज्ञान आहे हे दाखविण्यासाठी अर्जासोबत त्याचे आधार कार्डाची छायाकीत प्रत दाखल केलेली आहे. त्याप्रमाणे श्लोक याची जन्म तारीख २०.०५.२०१७ अशी आहे. यावरुन प्रथमदर्शनी असे दिसून येते की, आजमितीला सदर मुलाचे वय १८ वर्षांपेक्षा कमी आहे व तो अज्ञान आहे.

**१३.** सदर मिळकत गैरअर्जदार क्रमांक १ याचे नांवे आहे व त्यात अर्जदार क्रमांक २ ही अ.पा. क. म्हणून दर्शविलेली आहे हे दाखविण्यासाठी अर्जदार क्रमांक २ हिने सदर मिळकतीच्या ७/१२ उता-याची छायाकिंत प्रत या अर्जासोबत जोडलेली आहे. तसेच, सदर मिळकत ही अर्जदार क्रमांक २ हिने विक्री करारनामा/इसारपावती प्रमाणे लासूर, ता. गंगापूर येथील श्री. पियुष जयकुमार जैन या इसमास रुपये ६७,४६,४००/- चे मोबदल्यात विकण्याचे ठरविलेले आहे, हे दाखविण्यासाठी तिने नोटरी पब्लीक यांच्या पुढे नोंदविलेला इसारपावती करारनाम्याची प्रत देखील जोडलेली आहे.

**१४.** उपरोक्त दोन दस्तऐवजांवरुन असे दिसून येते की, सदर मिळकत ही गैरअर्जदार क्रमांक २ हिने ६७,४६,४००/- चे मोबदल्यात विकणार आहे. मात्र, आता मिळणा-या मोबदल्याची रक्कम ही तेथील जमिनींच्या किमतीच्या मानाने व बाजारभाव लक्षात घेता योग्य व रास्त आहे, हे दाखविण्याकरीता अर्जदार क्रमांक २ हिने कोणताही तुलनात्मक कागदोपत्री अथवा तोंडी पुरावा दिलेला नाही. त्यामुळे ती किंमत रास्त आहे असा निष्कर्ष काढणे योग्य होणार नाही.

**१५.** अर्जदार क्रमांक २ ही अज्ञान - श्लोक याची जनक आई म्हणजे नैसर्गिक पालक आहे, असे असले तरी अज्ञान बालकांच्या मिळकतीची कोणत्याही प्रकारे विल्हेवाट लावण्यापुर्वी पालकाने न्यायालयाकडुन त्यासाठी परवानगी मिळविणे आवश्यक असते. अशी परवानगी देण्यापुर्वी न्यायालयाने असे पाहिले पाहिजे की, अज्ञान बालकाचे पालक सदर मिळकत त्या अज्ञान बालकाच्या हितासाठी व कल्याणासाठी विक्री करीत आहे. अशी परवानगी देतांना अज्ञान बालकाचे हित व कल्याण हाच सर्वोच्च मुद्दा असतो.

**१६.** येथे असे नमूद करणे गरजेचे आहे की, श्री. पियुष जयकुमार जैन या इसमास सदर मिळकत विकण्याचा जो लेखी करार अर्जदार क्रमांक २ हिने केलेला आहे तो नोटरी पब्लीक यांच्यापुढे नोंदविल्याचे दिसते. नोंदणी कायद्याच्या तरतुदींनुसार नोटरी पब्लीक

यांच्यापुढे केलेल्या अशा करारनाम्याला कायदेशीर मान्यता नाही. नोंदणी कायद्यातील तरतुदींनुसार रुपये १००/- किंवा त्यापेक्षा जास्त मोबदला असलेल्या मिळकतीबाबत खरेदी विक्रीचा व्यवहार किंवा त्याबाबतचा करारनामा हा दुयम निबंधक यांचेपुढे नोंदविलेला असणे गरजेचे आहे. त्यामुळे अशा करानाम्यांच्या आधारावर जर अर्जदार क्रमांक २ ही अज्ञानाची मिळकत विकणार असेल तर त्यातून अज्ञान मुलाचे हित व कल्याण साधले जाईल असे दिसून येत नाही.

१७. उपरोक्त कारणांच्या आधारे मी या निष्कर्षास आलेलो आहे की, अर्जदार क्रमांक २ हिने तिच्या अर्जात व शपथपत्रात नमूद केलेल्या कारणांसाठी सदर मिळकत विकण्यास परवानगी दिली तर त्यातून अज्ञान मुलाचे हित व कल्याण साधले जाईल असे दिसून येत नाही. अशा परिस्थितीत सदर मिळकत विकण्यास अर्जदार क्रमांक २ हिला परवानगी देणे न्यायोचित होणार नाही. म्हणून, मी मुद्दा क्रमांक १ चे उत्तर नाकारार्थी नोंदवित आहे.

**मुद्दा क्रमांक २ करीता:-**

१८. वर उल्लेख केल्याप्रमाणे अज्ञान मुलाची सदर मिळकत विक्री करण्यास अर्जदारास परवानगी देणे न्यायोचित होणार नाही. अशा परिस्थितीत हा अर्ज नामंजूर होण्यास पात्र आहे. सबब, मुद्दा क्रमांक २ चे उत्तरादाखल मी खालील आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. अर्ज नामंजूर (Rejected) करण्यात आला आहे.

२. खर्चाबाबत आदेश नाही.

Digitally signed by SHYAMKANT BHALCHANDRA BAHALKAR
Date: 2026.03.30 13:53:46 +0530

**(शा. भा. बहाळकर)**
**अतिरीक्त सत्र न्यायाधीश, गंगापूर,**
**जि. छत्रपती–संभाजीनगर**

**दिनांक:- २८.०३.२०२६**